
# पारसमणी

ईश्वर पेटलीकर

अनुवाद : ललिता रिसबूड



₹ 16.00

ISBN 812373192-2

13140524

nbt.india

एकः सूते सकलम्

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 978-81-237-3192-6

प्रथम प्रकाशन : 2000 *(शके* 1922)
पहिली आवृत्ती : 2004 *(शके* 1926)
दुसरी आवृत्ती : 2013 *(शके* 1934)
तिसरी आवृत्ती : 2013 *(शके* 1935)

मूळ © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2000

Parasmani *(Marathi)*

**₹ 16.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्युशनल एरिया, फेज-II
वसंत कुंज, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.
Website : www.nbtindia.gov.in

*नवसाक्षर साहित्यमाला*

# पारसमणी

**ईश्वर पेटलीकर**

रूपांतर
**वर्षा दास**

अनुवाद
**ललिता रिसबूड**

चित्रे
**संतोष गुप्ता**

nbt.india
एकः सूते सकलम्

**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**



नाथाचा मुलगा बबलू शाळेत जाऊ लागला होता. हे पाहून नाथाचे मन आनंदाने भरून गेले होते. बबलू आता चौथीत आला होता. तो शेजारील लोकांची चिठीचपाटी लिहून देत असे. आणि हे पाहून अंगठेबहादूर बाप अगदी धन्य होत असे.

बबलूला ढोल वाजवायला नाथाने शिकवले नाही. बबलूने ढोल काढला की नाथा त्याला अडवे. तो म्हणे, ‘‘मुलाचे लक्ष अभ्यास सोडून इतर कुठेही जायला नको. अशाने विद्या येणार नाही.’’

बबलू सातवीत गेला. तोवर नाथाने त्याला कामाला लावले नव्हते. नाथाची एकच आस होती. मुलगा सातवी पास होऊ दे. मास्तर बनू दे. परंतु, एखादा सारी गंगा पोहून येतो आणि मग काठाशी येऊन बुडतो. तसेच बबलूचे झाले. तो सातवीत गचकला. दोनदा परीक्षेला बसला. पण यश लाभले नाही.

सोळा वर्षाचा बबलू ना धड काम करायचा ना धड शिकायचा. बरोबर चारी ठाव खाणे आणि गावातील दोस्तांबरोबर तिन्ही त्रिकाळ हिंडणे. एवढेच तो करीत असे.

पाहता पाहता तीन वर्षे उलटली. महागाई वाढली होती. नाथा अगदी जेरीस आला होता. बबलूला तर मजूरी करणे माहीतच नव्हते. त्याची आई कधीच देवाघरी गेली होती. धाकटी बहीण जनी घरातले कामकाज उरकीत असे. शेतावर मोलमजूरी करीत असे. बबलू एवढा शिकलासवरलेला. पण तो इतर मुलांबरोबर उनाडपणा करीत असे. नाथाला रोज खंत वाटे. मनात येई, 'मीच कमनशिबी. मला हे काय सुचले? मी मुलाला का शिकवले? नसते शिकवले तर काय आकाश कोसळले असते?'

नाथाचा धावा जणू देवाने ऐकला. बबलूने एक नोकरी शोधून काढली. गावात हरिजनांचे एक वसतिगृह होते. हरिजन सेवक संघ ते चालवीत असे. वसतिगृहात केवळ पंधरा मुली होत्या. तिथे बबलूला काम मिळाले. दरमहा पंचवीस रुपये पगार ठरत होता. बबलूने वडिलांची परवानगी विचारली.



नाथाला एकच बाब मनात खटकत होती. बबलू चुकून मुलींना शिवला तर? तिथले पाणी देखील साफ नाही. भावकीतील लोकांना काय वाटेल? मुलाला तिथे कामावर पाठवावेसे वाटत नव्हते. पण इकडे मुलाची अशी ही टोळभैरवकी! ते पाहून ही नोकरी नको असे सांगणेही जीवावर आले होते. अगदी इकडे आड, तिकडे विहीर झाली होती.

शेवटी नाथाने मधलाच मार्ग काढला. त्याने मुलाला काही अटी घातल्या. वसतिगृहातील मुलींना शिवायचे नाही. आपले पाणी वेगळे ठेवायचे. तिथले काहीही खायचे नाही.

बबलूने सगळे कबूल केले. तो कामावर रुजू झाला. आनंदीबाई वसतिगृहाची संचालिका होती. ती नुकतीच तिथे आली होती. तिचे काम चोख होते. ती मनाने मायाळू तर होतीच. शिवाय वागणे बोलणेही गोड! सारा गाव तिची वाखाणणी करू लागला होता. आनंदीबाईचे पती सुमंतभाऊ. तेही हरिजनांची सेवा करीत.

तो बबलूच्या नोकरीचा पहिलाच दिवस होता. सुमंतभाऊ एका मुलीला घेऊन आले. ती बारा वर्षाची एक हरिजन मुलगी होती. तिला आई-वडील नव्हते. मुलगी होतीही झिपरी, घाणेरडीच. बबलूने नाक



मुरडले. परंतु आनंदीबाईंनी अगदी मायेने तिचा हात धरला. तिला आपल्या खोलीत नेले. मुलगी अशा लोकांत कधी मिसळली नव्हती. दाव्याला बांधायला आणलेले जनावर जसे एकदम सैरभैर होते, तसेच तिचे झाले. ती बावचळली. तीहून अधिक चमकला बबलू!

आनंदीबाईंनी माठातले पाणी काढले. मुलीला प्यायला दिले. पितळेचा पेला अगदी चकाकत होता. मुलगी डोळे फाडून बघू लागली. तिला वाटले, आपण जादूनगरीत तर आलो नाही? मुलीची आई गेली तेव्हा तिला जवळचे असे कुणीच नातलग नव्हते. कुणीतरी तिला लांबच्या आत्याबाईंच्या मुलीकडे सोडले. तिच्या पतीने हिला खूप छळले. महिनाभर घरात ठेवले असेल नसेल. नंतर घालवूनच दिले. लोक तिला उरलेसुरले खायला घालीत. एखाद्या कुत्र्याला घालावे तसे. तिथे ही मुलगी सुमंतभाऊंना दिसली.

आनंदीबाईंनी तिला आईहूनही कांकणभर अधिक मायेने पाणी दिले. परंतु मुलीला वाटले, ‘असा पेला आणि असे पाणी! हे मला थोडेच असणार?’ ताईंनी तिला आपुलकीने पाणी पाजले. मग विचारले, “तुझे नाव काय मुली?”

मुलगी बोलायला काचकूच करीत होती.

आनंदीबाईंनी तिला पोटाशी घेतले. म्हणाल्या, ''भिऊ नकोस. आपलं नाव सांग.''

शेवटी अडखळत ती बोलली, ''माझे नाव वाली.'' आनंदीबाईला अगदी हायसे वाटले. तिने वालीला जवळ घेतले, म्हणाली, ''अग वेडे, किती छान नाव आहे. घाबरतेस कशाला?''

वालीचा संकोच पळभरात कमी झाला. ती ताईंना चिकटलीच. तिला ममतेचे सुख मिळत होते. अनाथ मुलगी ती. लाघवीपणे म्हणाली, ''काय माझे नाव तुम्हाला आवडले?''

आनंदीबाई म्हणाल्या, ''मला तर खूप आवडलं!'' मग ताईंनी वालीला आपल्या स्वयंपाकघरात नेले. जेवूखाऊ घातले. नंतर विहिरीवर नेले. पाणी शेंदून काढले. तिला आंघोळ घातली. वालीने आपला चेहरा आरशात बघितला. तिला हसूच फुटले.

सुमंतभाऊ म्हणाले, ''वाली तू तर पार बदलून गेलीस. आता शाळेतून मुली येतील. तुला बघून हरखून जातील.

ताईंनी वालीचे केस विंचरले. बबलू सगळे पाहत होता. जणू एखादे नाटकच बघतोय. त्याला आपली आई आठवली. कधी जनीचे केस धुळीने माखत. कधी एखादी ऊ सापडे. अशा वेळी आई तिलाच





धपाटा देत असे. आणि इथे? ताई अगदी निवांतपणे वालीच्या डोक्यातील उवा काढत आहेत.

बबलू सकाळी अगदी ऐटीने घरून खुजाभर पाणी घेऊन आला होता. पण संध्याकाळी तो भरताना त्याला आपला अभिमान फुकाचा वाटला. त्याला वाटले, आपले काहीतरी चुकते आहे. ताईंचे लक्षच नव्हते. त्याने गुपचूप खुजा एका कोपऱ्यात ठेवला. त्याच्या मनात एकच गोंधळ उडाला. वाटले, 'मी आपले पाणी वेगळे नाही ठेवले तर? इथलेच पाणी वापरले तर? असा काय डोंगर कोसळणार आहे? ताई कुठे शिवाशीव मानतात? त्या तर शिकल्या सवरलेल्या आहेत. एवढेच काय! जातही वरची आहे.'

बबलू नोकरीला लागून दोन आठवडे झाले होते. कैकजण ताईंच्या चांगुलपणाचे गुणगान करीत. पण त्याने बघितलेले कितीतरी पट होते. इथे बबलूला कुणी म्हणत नसे की हे पाणी पी किंवा हे खा. एकदा ताई म्हणाल्या, ''बबलू, तू तर माझ्या हातचे पण खात नाहीस वाटतं. तू तर आमचाच आहेस. तू खात नसताना, आमचा घास घशात कसा बरं उतरेल?''

बबलू एकदम बोलून गेला, ''असे असेल तर मी खात जाईन. वडिलांना हवे तेवढे रागावू दे!''



पण ताई म्हणाल्या, ''नको बाबा! मनात नसताना तू खाल्लंस तर मला वाईट वाटेल!''

बबलू काही बोलला नाही. त्याने खाल्लेही नाही. पण या घटनेने तो बेचैन झाला.

एक दिवस वसतिगृहात एक मोठे अधिकारी आले होते. त्यांचे नाव होते परीक्षितदादा. दारातच मुलींनी त्यांना गराडा घातला. आनंदाने गलका करू लागल्या. ''दादा आले! दादा आले!'' दादांनी सगळ्या मुलींतून नेमके वालीलाच हेरले. तिला जवळ बोलावून म्हटले, ''ही तर आपली नवी बहीण दिसते. चला, हिची ओळख करून घेऊ या.''

नंतर परीक्षितदादा मुलींबरोबर जेवायला बसले. बबलू ताईंजवळ आला. हळूच कुजबुजला, ''मी आज तुमच्याबरोबर जेवणार आहे.''

ताईंनी विचारले, ''मनापासून बोलतोस ना? तोंडदेखले तर नाही?''

बबलू म्हणाला, ''अगदी मनापासून सांगतोय.''

त्या दिवशी बबलू सर्वांबरोबर जेवला. त्याचे पोट खूप समाधानाने भरले. जेवून तो घरी आला. घरी तो वडिलांना म्हणाला, ''आज मी नाही जेवणार.''

''कां?''

''मी जेवून आलो आहे.''

नाथाचा खूप चडफडाट झाला. त्याने मुलाला दोन कानफटात दिल्या.

बबलू म्हणाला, ''बाबा, ऐका तर खरं. उगीच कावता आहात. परीक्षितदादा, सुमंतभाऊ, आनंदीबाई सगळेच मुलींबरोबर जेवतात. आपण काय त्यांच्याहून वरचढ आहोत? मग का जेवू नये?''

सवालाला जवाब देत नाथा म्हणाला, ''ती सगळी मोठी माणसे आहेत. आपण त्यांची बरोबरी करू नये. भावकी आपल्याला वाळीत टाकेल.''

बबलू नेहमीसारखा वसतिगृहात झोपायला निघून गेला. नाथाने विचार केला, 'नोकरी सुटली तर याला परत टवाळकी सुचेल. दरमहा पंचवीस रुपये येतात. तेही जातील. त्यापेक्षा असं करावं. याच्यावर पाळत ठेवावी.' यानंतर रोज दोन वेळा जनी बबलूला बघून येऊ लागली. एक दिवसाआड नाथा पण तिकडे फेरी मारून येई.

आनंदीबाईंना जनी वारंवार का येते ते कळून चुकले. पण जनी काही बोलली नाही. ती जबाबदारी जाणून येत असे. वसतिगृहातील मुलींना न शिवायची खबरदारी घेत असे. तिथला उंबरठाही ओलांडत नसे.

एके दिवशी बबलू रात्री झोपायला वसतिगृहात





आला. जनी गुपचुप मागोमाग आली. ती वडामागे लपून हळूच डोकावून बघू लागली. पुनवेची रात होती. अंगणात आनंदीबाई आणि मुली गरबा खेळत होत्या. पंधरा मुलींचा ठेका एक झाला होता.

आनंदीबाई म्हणाली, ''आता कुणीतरी गाणं सुरू करा.''

एकजण बोलली, ''वाली छान गाते.''

वाली गाऊ लागली, ''पावागडहून आले तर...'' एक लांबलचक तान घेऊन तिने गरबा सुरू केला. मुली डोलू लागल्या. दोन तीन कडवी होताच जनीला राहावेना. तिचे मन आणि शरीरही गरबा नाचायला अगदी अधीर झाले. ती पळतच गोलात शिरली.

''कोण? कोण?'' म्हणत सगळे थबकले.

ताई म्हणाल्या, ''जनीच आहे.''

थांबलेला गरबा क्षणात सुरू झाला. जनी भान हरपून गरबा खेळू लागली.

आता तर जनीला वसतिगृहाशिवाय करमेनासे झाले. कधीपासूनच तिला तिथली फुले केसात माळावीशी वाटत होती. ताई तिला फुले तोडू देत. तिची वेणीफणी करून देत. ''तुझे कपडे किती



मळलेत बघ,'' म्हणत तिला साबणही देत. जनी विहिरीवर कपडे धुवीत असे. जनीला वाटले, ''ताईंना कामात हातभार लावला तर बरे वाटेल नाही?'' मग ती ताईंना पाणी शेंदून देऊ लागली. त्यांचे कपडे धुवून टाकू लागली. बबलूला मदत करू लागली. नोकरी खरे तर बबलूचीच. पण जनी सारा वेळ तिथे रमत असे.

नाथाला आता चिंता वाटू लागली. धार्मिक कारणांमुळे नाही, तर गावकीमुळे. नाथा वसतिगृहात गेला की, त्याचेही मन विरघळत असे. आनंदीबाई त्याला काका म्हणत. ती हाक ऐकून तर नाथाला लाज वाटे. नाथाचे येणेजाणे तिथे हळूहळू सवयीचे झाले. परिणाम चांगलाच झाला. एक दिवस त्याने जाहीर केले, ताईंकडील माठातील पाणी पिण्यात गैर नाही. किंवा येथील स्वयंपाकघरातील शिजलेले खाण्यात काही वावगे नाही.

एक दिवस सुमंतभाऊंचे डॉक्टर मित्र आले. त्यांना वाटले बबलूला शहराला घेऊन जावे. बबलू दिसायला नीटनेटका होता. कामात चटपटीत होता. बोलणे आदबशीर होते. बबलूचे भले व्हावे म्हणून डॉक्टरांबरोबर त्याला पाठवले गेले.

आता वसतिगृहातील कामाचे काय? नाथा म्हणाला,





"जोवर दुसरा कुणी मिळत नाही तोवर मीच निभावून नेईन." जनी वडिलांना मदतीचा हातभार लावत असे. ताई आणि सुमंतभाऊंचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत चालला. नाथाला आता वसतिगृहाविना करमत नसे.

शाळेला उन्हाळ्याची सुटी लागली. मुलींचे आई-वडील त्यांना घरी घेऊन गेले. वाली अनाथ होती. ताई आणि सुमंतभाऊंना मुंबईत जरुरीचे काम होते. वालीला जाणवले की, ताईंना आपलीच चिंता आहे. ती म्हणाली, "नाथाकाका मला माझ्या आतेबहिणीकडे सोडतील. सुटीत मी तिथेच राहीन." आनंदीबाईंच्या मनात शंकेची पाल चुकचुकली, 'न जाणो त्यांनी वालीला नाही ठेवून घेतले तर?' पण वाली ठाम होती.

नाथा वालीला तिच्या आतेबहिणीकडे सोडायला गेला. दोघे जणू बापलेकच होते. इकडे ताईंची मुंबईला जायची तयारी सुरू होती. तिकडे नाथा वालीला घेऊन तोंड पाडून परत आला.

आनंदीबाईंनी विचारायच्या आतच वाली हमसून हमसून रडू लागली. आनंदीबाईंनी तिला कुशीत घेतले. त्यांच्या डोळ्यातूनही घळाघळा पाणी येत होते. नाथाचेही डोळे भरून आले होते.





ताईंनी वालीला समजावले, ''उगी बैस वाली. मी तुला सोडून मुंबईला जाणार नाही.''

नाथाचे मन भरून आले. दाटलेला गळा मोकळा करत तो म्हणाला, ''ताई वालीची काळजी करू नका. वालीला मी आपल्या घरी घेऊन जातो. देवाशपथ सांगतो, जनीसारखे संभाळीन.''

ताईंनी विचारले, 'तुझ्या भावकीचे काय?''

''जातवाले काय करतील? कुणी विचारले तर उत्तर द्यायला मी भक्कम आहे.''

नाथा वरवर नाही, तर अगदी मनापासून बोलत होता. ताईंनी ते मानले. वाली नाथाबरोबर निघाली. आधी नाथा तिला परघरी पोचवायला गेला होता. आता तिला आपली मुलगी मानून घरी नेत होता.

आनंदीबाई आणि सुमंतभाऊ हे सेवाभावी जोडपे होते. माणुसकीने आज ते भरून पावले.

*Printed at :* **D.R.Printers & Convertors Pvt. Ltd.**, A-31, Sector-IX, Noida (U.P.)